पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 10/10/2019 (गुरूवार)
(सायंकाळ)

---

## अवैधरीत्या मोहाफुल गावठी दारु बाळगणाऱ्या आरोपीतांना अटक
## एकुण 15,71,000/– रूपयाचा मुद्देमाल जप्त

पो.स्टे. देवलापार :– दिनांक 09/10/2019 सपोनि प्रविण बोरकुटे ठाणेदार देवलापार हे स्टाफसह 14:00 वा. दरम्यान पेट्रोलिंग कामी पो.स्टे परिसरात फिरत असतांना गोपनिय सुत्रा कडुन माहिती मिळाली की, आगामी होणाऱ्या विधानसभा निवडणुकी मध्ये वापर करण्याचे उद्देशाने दारू साठा करून ठेवला. तसेच मौजा पिंडकापार येथिल वनविभाग अंर्तगत जंगल शिवारात असलेल्या बावनथडी धरणा लगत वाहत जाणाऱ्या नाल्या जवळ 3 ते 4 इसम हातभट्टी लावुन मोहाफुलाची गावठी दारू काढीत आहेत अशी माहिती मिळाली. या माहितीच्या आधरे गुप्त माहितीच्या आधारे देवलापार पोलीसांनी घटनास्थळी धाड टाकली अवैद्यरित्या हातभट्टी लावुन मोहाफुल दारू काढणारे इसम पोलिसांना पाहुन जंगलात पळु लागले. त्यांचा जंगलात पाठलाग केला असता यांमध्ये एकुण आरोपी क्र. 1) दिनेश हरिलाल कोडवते, वय 30 वर्ष, रा. पिंडकापार व 2) सुर्यभान देवराव खंडाते, वय 28 वर्ष, रा. गर्रा बघेडा, ता. तुमसर, जि. भंडारा याना ताब्यात घेण्यात आले व उर्वरीत आरोपीतांनी जंगलाचा फायदा घेत पळ काढला. आरोपीतांच्या ताब्यातुन मोहाफुल हातभट्टीची गावठी दारू गाळण्याच्या उपयोगाचा 15700 लिटर मोहाफुल रसायन सडवा आणि 2900 लिटर मोहाफुल हातभट्टीची गावठी दारू असा एकुण 15,71,000/– रूपयाचा मुद्देमाल आरोपीतांच्या ताब्यातून जप्त करण्यात आला आहे. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन देवलापार येथे आरोपीतांविरुध्द महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हे नोंद करण्यात आले असुन सहा आरोपीतांना अटक करण्यात आलेली आहे. पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री. प्रवीण बोरकुटे 9545667223 हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामिण श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधिक्षक श्रीमती मोनिका राऊत, उपविभागीय पोलिस अधिकारी रामटेक विभाग श्रीमती नयन आलुरकर यांचे मार्गदर्शनात सहायक पोलीस निरीक्षक श्री. प्रवीण बोरकुटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोहवा अशोक उईके, पोना सतिश नागपुरे, गजानन माहुरे, पोशि विजय बिसेन, गजानन कविराज यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.



## पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथील चारीचे गुन्हयातील आरोपीतांचा 48 तासामध्ये शोध लावून गुन्हयातील मुद्देमाल आरोपीतांकडून हस्तगत केल्याबाबत

नागपुर पो.स्टे. एमआयडीसी बुटीबोरी येथे दि. 07/10/2019 रोजी फिर्यादी नामे– पीयूष रमेश तुपकर, वय 33 वर्ष, रा. नदंनवन प्लॉट क्र. 34 कबीर नगर सक्करदरा नागपूर यांनी तोंडी रिपोर्ट दिला कि, सालईधाबा येथे फिर्यादीची मनोरमा कट्रक्शन कंपनी असुन येथे त्याचे मालकीचा 10 चक्का ट्रक कंपनीत उभा असता दि. 07/10/19 चे 07:00 वा पुर्वी अज्ञात आरोपीने कंपनीत उभा असलेल्या ट्रक चे 08 चक्के डिक्ससह अदांजे कि. 20,0000/–रू. चा मुद्देमाल चोरून नेला. फिर्यादीचे रिपोर्ट वरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी ला अप.क्र. 342/19 कलम 379 भादवि प्रमाणे गुन्हा नोंद असुन तपासात आहे.

सदर गुन्हयाचे घटनास्थळी पोलीस निरीक्षक श्री. विनोद ठाकरे व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे कर्मचारी यांनी भेट देवुन पाहणी केली एकाच ट्रक चे आठही चाके काढुण नेल्याने सदर ठिकाणी कंपनीत काम करणारे 05 कर्मचारी तेथेच झोपत असुन सुध्दा सदर धाडसी चोरी झाल्याने परीसरात गुप्तमुखबीर यांना लावण्यात आले. गुप्तमुखबीर यांचे कडुन प्राप्त माहीतीवरून दि. 09/10/19 रोजी गुन्हे प्रकटीकरण पथकाने कंपनीत काम करणारे सशंयीत आरोपी क्र. 1) निरजसिंग राजमठसिंग परीहार, वय 21 वर्ष, रा. कुहरी चौराहर जिल्हा सिध्दी मध्यप्रदेश ह.मु. साईधाबा ता.हिगंणा जि. नागपूर यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता उडवा उडवीची उत्तरे दिली. त्याला पो.स्टे. ला आणुन विश्वासात घेवुन विचारपुस केली असता त्याने मालकाने दोन महीण्याचा वारवार मागणी करून ही पगार दिला नसल्याचे कारणाने कंपनीत काम करणारा साथीदार संदीप कुमार कोल, वय 21 वर्ष, रा. सालईधाबा, ता.हिगंणा, जि. नागपूर याचे मदतीने चोरी करून माल मोरारजी कंपनी समोरील पंचरवाला मो. गुलाम सत्तर अंन्सारी यांचे मदतीने खापरी येथे मो. अकबर याचे दुकानावर कंपनीतील पिकअप गाडीने पोहविला व दोन तीन दिवसात माल विक्री करून पैसे देणार असल्याचे सांगीतल्याने आरोपी क्र. 2) संदीप कुमार बाबुलाल कोल, वय 21 वर्ष, रा. सालईधाबा यास कंपनीतुन ताब्यात घेवुन आरोपी क्र. 3) मो. गुलाम सत्तर अंन्सारी, वय 23 वर्ष, रा. मोरारजी कंपनी समोर एमआयडीसी बोरी याचे शोध कामी गेले असता सदर आरोपी हा नागपूर येथे नातेवाईकांन कडे गेला असल्याने सदर आरोपी चा नागपूर येथे शोध करून त्यास पारडी नागपूर येथुन ताब्यात घेण्यात आले. पो.स्टे. ला परत येवुन आरोपी क्र. 1 ते 3 यांना दि. 09/10/19 चे 11:09 वा अटक करण्यात आली. अटक आरोपी क्र. 1 ते 3 याचा मा. प्रथम वर्ग न्यायालय हिगंणा याचे कोर्टातुन आरोपीचा पोलीस कस्टडी रिमांड प्राप्त करून आरोपी राजमठसिंग परीहार, वय 21 वर्ष, रा. कुहरी चौराहर जिल्हा सिध्दी मध्यप्रदेश ह.मु. साईधाबा ता.हिगंणा जि. नागपूर याचा कबुली जवाब नोंदविण्यात आला. पथक आरोपी सह खापरी नागपूर येथे मो.अकबर अन्सारी यांचे पंचरचे दुकानावर गेले असता आरोपी मो. अकबर मुस्ताक अन्सारी यास मालाबाबत विचारपुस केली असता त्याने सदरचा माल टेकानाका येथील मो. गुड्डु अन्सारी यास 80,000/–रू. मध्ये विकल्याचे सांगीतल्याने त्यास ताब्यात घेवुन त्याचे कडुन माल विक्री करून मिळविलेली रक्कम 80,000/– रू. जप्त केली. आरोपी मो. अकबर मुस्ताक अन्सारी सह नागपूर टेकानाका कामगार नगर जवळील मो. गुड्डु अख्तर अन्सारी, वय 27 वर्ष, रा. कामगार नगर उप्पलवाडी नागपूर यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्याने सदरचा माल मो.अकबर यांचे कडुन 80,000/–रू. विकत घेतला असुन सदर माल जप्त करण्यात आला. पो.स्टे. ला माल व आरोपी येवुन आरोपी क्र. 4) मो. अकबर मो. मुस्ताक अन्सारी, वय 21 वर्ष, रा. उपरोल ता. उपरोल सरीफ जि. वैशाली बिहार ह.मु. खापरी मोहम्मद अली पेट्रोलपंप येथे नागपूर, 5) मो. गुड्डु मो. अख्तर अन्सारी, वय 27 वर्ष, रा. कामगार नगर, उप्पलवाडी, नागपूर यांना सदर गुन्हयात दि.

10/10/19 चे 22:33 वा. सदर गुन्हयात अटक करण्यात आली. सदर गुन्हयात आरोपी मो. गुड्डु अन्सारी याचे कडुन 08 टायर 08 डिस्क व आरोपी मो. अकबर अन्सारी याचे कडुन टायर डिस्क विक्री चे 80000 रू. असा एकुण 28,0000/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदरचा गुन्हा हा पोलीस अधिक्षक साहेब नागपूर जिल्हा ग्रामीण, अप्पर पोलीस अधिक्षक श्रीमती मोनिका राऊत, उपविभागीय पोलीस अधिकारी नागपूर विभाग नागपूर श्री. आर एस. चव्हाण यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री. विनोद ठाकरे यांचे नेतृत्वात व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस हवालदार शैलेन्द्र नागरे, पो.हवा. किशोर डेकाटे, पोलीस नायक इकबाल शेख, प्रफुल राठोड, पो.शि रमेश नागरे यांनी आपले बौध्दीक कौशल्य व तत्परतेने गुन्हयाचा तपास करून 48 तासाचे आत गुन्हा उघडकीस आणला.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर